# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- १५०१/२०१७ मधील तक्रार क्र. २८९/२०१८

अपिलार्थी श्री. रमण भिकाजी वाईरकर
३०० मेढा, मालवण, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, निवासी नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय मालवण, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ११.१२.२०१७**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १७.९.२०१६ | ---- | १५.१२.२०१६ | ---- |

अपिलार्थी यांनी आयोगास सादर केलेल्या दिनांक २६.४.२०१७ रोजीच्या द्वितीय अपिलावर आज दिनांक ११.१२.२०१७ रोजी फास्ट ट्रॅक सुनावणी (Fast Track Hearing) घेण्यात आली. सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७ (६) व ७(९) मधील तरतुदीच्या अनुषंगाने, अपिलार्थीस उपलब्ध माहिती १५ दिवसात नि:शुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
**(थँक्सी फ्रान्सिस थेकेकरा)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ११ डिसेंबर, २०१७.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

प्रथम अपिलीय प्राधिकारी, तहसिलदार, तहसिल कार्यालय मालवण, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.

**विवेचन**

तक्रारकर्ता यांनी आयोगास सादर केलेल्या द्वितीय अपिलावरील दिनांक १०.३.२०१८रोजीच्या तक्रारीवर आज दिनांक ४.१२.२०१९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलिय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी त्यांच्या तक्रार अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांना आयोगाच्या आदेशानंतरही माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना आयोगाच्या आदेशानंतरही उपलब्ध माहिती दिल्याचे दिसून येत नाही.

तक्रारकर्ता अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानंतरही तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही. ही अतिशय गंभीर बाब असून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये याबाबतचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

श्रीम. धनश्री भालचीम, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा महसूल नायब तहसलिदार यांनी तक्रारकर्ता यांना आयोगाच्या आदेशानंतरही माहिती दिलेली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० (१) अन्वये रुपये

KOKAN BANCH

२५,०००/- इतक्या शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा दिवसांत त्यांनी आ ३०योगाकडे सादर करावा . अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

**सही/-**

**(के.एल.बिश्नोई)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ४ डिसेंबर, २०१९

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्रीम. धनश्री. भालचीम,
महसूल नायब तहसलिदार, मालवण
तहसिल कार्यालय मालवण, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग. **यांना प्रत.**
विद्यमान जन माहिती अधिकारी, श्री. ए. एन.मालवणकर,
महसूल नायब तहसिलदार, मालवण
तहसिल कार्यालय मालवण, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग. **यांचेमार्फत रवाना.**

## विवेचन

उपरोक्त आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम-२० (१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण ३० दिवसांत आयोगास सादर करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती धनश्री भालचीम, महसूल नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मालवण (सध्या कार्यरत : नायब तहसिलदार महसूल, तहसिल कार्यालय परतूर, जि.जालना) यांनी दि.११/३/२०२० च्या पत्रान्वये आयोगास लेखी खुलासा सादर केला की, त्या औरंगाबाद महसूल विभागात रूजू होण्याकरिता जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांच्या दि.२६/५/२०१७ रोजीच्या आदेशान्वये कार्यमुक्त झाल्या असून, त्याच आदेशान्वये सदर पदाचा कार्यभार श्री.एस.एस.खरात, पुरवठा निरीक्षण अधिकारी, मालवण यांचेकडे दिलेला आहे. सदर कालावधीत त्या कार्यरत नव्हत्या, त्यामुळे त्यांच्यावर शास्ती लादण्यात येऊ नये, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती धनश्री भालचीम दि.२६/५/२०१७ रोजीच्या आदेशान्वये कार्यमुक्त झाल्या असून, सदर पदाचा कार्यभार श्री.एस.एस.खरात, पुरवठा निरीक्षण अधिकारी, मालवण यांचेकडे होता हे स्पष्ट होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एस.एस.खरात, महसूल नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मालवण (पुरवठा निरीक्षण अधिकारी, मालवण) यांनी आयोगाच्या दि.११/१२/२०१७ रोजीच्या आदेशानंतरही तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही. ही अतिशय गंभीर बाब असून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये याबाबतचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.ए.एन.मालवणकर, महसूल नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मालवण यांनी आयोगाच्या दि.११/१२/२०१७ रोजीच्या आदेशाप्रमाणे काय कार्यवाही केली याबाबतचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच आयोगाच्या दि.११/१२/२०१७ रोजीच्या आदेशापासून आजपर्यंतच्या कालावधीत जे अधिकारी, जन माहिती अधिकारी तथा महसूल नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मालवण पदावर कार्यरत होते त्यांनी आयोगाच्या दि.११/१२/२०१७ रोजीच्या आदेशानंतरही तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी त्यांच्या कार्यकाळासह आयोगास तात्काळ सादर करण्याबाबत कळवावे असे तहसिलदार, मालवण यांना निर्देश देणे योग्य होईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती धनश्री भालचीम, महसूल नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मालवण (सध्या कार्यरत : नायब तहसिलदार महसूल, तहसिल कार्यालय परतूर, जि.जालना) यांनी सादर केलेला खुलासा मान्य करण्यात येत आहे.

२. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एस.एस.खरात, महसूल नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मालवण (पुरवठा निरीक्षण अधिकारी, मालवण) यांनी आयोगाच्या दि.११/१२/२०१७ रोजीच्या आदेशानंतरही तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही. ही अतिशय गंभीर बाब असून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आयोगास तात्काळ सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

KOKAN BANCH

३. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.ए.एन.मालवणकर यांनी आयोगाच्या दि.११/१२/२०१७ रोजीच्या आदेशाप्रमाणे काय कार्यवाही केली याबाबतचा लेखी खुलासा आयोगास तात्काळ सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन पुढील योग्य आदेश केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

४. तसेच तहसिलदार, मालवण यांना निर्देश देण्यात येत आहेत की, आयोगाच्या दि.११/१२/२०१७ रोजीच्या आदेशापासून आजपर्यंतच्या कालावधीत जे अधिकारी, जन माहिती अधिकारी तथा महसूल नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मालवण पदावर कार्यरत होते त्यांनी आयोगाच्या दि.११/१२/२०१७ रोजीच्या आदेशानंतरही तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी त्यांच्या कार्यकाळासह आयोगास तात्काळ सादर करण्याबाबत कळवावे.

सही/-

**(के.एल.बिश्नोई)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ जानेवारी, २०२१.

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना,**

१) श्री.अजय पाटणे,
तहसिलदार, तहसिल कार्यालय मालवण,
ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एस.एस.खरात, महसूल नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मालवण. -**यांना प्रत** - विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.ए.एन.मालवणकर,
महसूल नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मालवण,
ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग. **यांचेमार्फत रवाना.**

३) श्रीमती धनश्री भालचीम (तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा महसूल नायब तहसिलदार,तहसिल कार्यालय मालवण).
नायब तहसिलदार महसूल, तहसिल कार्यालय परतूर,
ता.परतूर, जि.जालना

## अपिल क्रमांक : के.आर- १५०१/२०१७ मधील तक्रार क्र. २८९/२०१८

अपिलार्थी श्री. रमण भिकाजी वाईरकर

**सुनावणी दिनांक ४.१२.२०२३ ( In Continuation of order dt. १८.१.२०२१)**

**विवेचन**

उपरोक्त आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम-२० (१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण ३० दिवसांत आयोगास सादर करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.

सदर सुनावणीस तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. एस. खरात, नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मालवण यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

**सुनावणीचा तपशील :**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. एस. खरात, नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मालवण यांनी दि.१३.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये आयोगास लेखी खुलासा सादर केला आहे की, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. धनश्री भालचिम यांनी जरी पदभार माझेजवळ दिला असला तरी मला माहिती अधिकाराच्या अर्जाबाबत कोणत्याही स्वरूपाची माहिती दिलेली नाही किंवा लेखी स्वरूपात कार्यभार न देताच कार्यमुक्त झाल्या होत्या त्यामुळे मला याबाबत कोणतीही कल्पना नाही. तसेच दि.११.१२.२०१७ रोजीच्या आदेशानंतरही तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही असे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी मी पूर्णपणे अनभिज्ञ होतो तसेच श्रीम. धनश्री भालचिम, नायब तहसिलदार यांनी मला लिखीत स्वरूपात कार्यभार न देताच परस्पर कार्यमुक्त झालेल्या होत्या. तसचे सदरचे आदेश हे निवासी नायब तहसिलदार यांच्या नावाने पारित झाल्यामुळे याची मला यत्किंचितही कल्पना नव्हती व नाही. यास्तव माहिती उपलब्ध न करून देणे हे

KOKAN BANCH

माझेकडून जाणीवपूर्वक घडलेले नाही. यास्तव त्यांच्यावर शास्ती लादण्यात येऊ नये, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**आदेश**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. एस. खरात, नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मालवण यांनी सादर केलेला खुलासा व त्यासोबतच्या कागदपत्रांवरून आयोगाचे समाधान झाले असून त्यांना दि. १३.१२.२०२१ रोजीचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

**(भूपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ४ डिसेंबर, २०२३

KOKAN BANCH